अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. २१/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ४७०९४ दि. १७/०९/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२१/२०१९

श्री चारुदत्त माणिकराव घाडगे
३०+३१/२ब/१, हिंगणे कर्वेनगर,
मीनाताई ठाकरे नगर, १/१ म्हाडा कॉलनी,
पुणे ४११ ०५२.

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री चारुदत्त माणिकराव घाडगे रा. ३०+३१/२ब/१, हिंगणे कर्वेनगर, मीनाताई ठाकरे नगर, १/१ म्हाडा कॉलनी, पुणे ४११ ०५२ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १५.०७.२०१९ रोजी अर्ज करून "अर्जामध्ये नमूद (श्री शरद दगडू खारगे, श्री रामचंद्र सोपान शिंदे, श्री राजेश राजाराम ग्रुर्रम, श्री राहुल शर्मा) कर्मचा-यांना ज्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत रुजू करून घेतले आहे. अशा शासकीय अभिलेखांची साक्षांकित माहिती मिळणे" बाबत माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दि. १४.०८.२०१९ रोजी माहिती प्रकट करण्याबाबत सुनावणी घेतली असून जा. क्र. जमाअ/आस्था/४०५४ दि. २८.०८.२०१९ अन्वये त्याचा निर्णय श्री चारुदत्त माणिकराव घाडगे यांना कळविला आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १५.०७.२०१९ | १५.०७.२०१९ | १४.०८.२०१९ | २८.०८.२०१९ | १४ |

अपिलार्थी यांनी "माहिती प्राप्त झालेली नाही" असे नमूद करून अपील क्र. २१/२०१९ चा अपील अर्ज दि. ०३.०९.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०३.०९.२०१९ | ०३.०९.२०१९ | २७.०९.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १६.०९.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री चारुदत्त माणिकराव घाडगे रा. ३०+३१/२ब/१, हिंगणे कर्वेनगर, मीनाताई ठाकरे नगर, १/१ म्हाडा कॉलनी, पुणे ४११ ०५२ हे उपस्थित होते. श्री तुकाराम कामथे जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते.

## विवेचन

श्री तुकाराम कामथे जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ प्रमाणे कार्यवाही करून जा. क्र. जमाअ/आस्था/४०५४ दि. २८.०८.२०१९ अन्वये अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे असे प्रतिपादन केले. तर अपिलार्थी श्री चारुदत्त माणिकराव घाडगे यांनी त्यांचे लेखी म्हणणे अपिलात सादर केले. त्यात त्यांनी प्रामुख्याने १) श्री राजेश राजाराम गुर्रम यांनी महानगरपालिका सेवेत रुजू होते वेळी सादर केलेली त्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मिळावी. २) श्री रामचंद्र सोपान शिंदे, श्री शरद दगडू खारगे आणि श्री राजेश शर्मा यांचे शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रे मिळणेबाबत नमूद केलेले आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी यांना त्यांचे वरील विवेचन मध्ये मुद्दा १, २ मध्ये नमूद केल्यानुसार माहिती ७ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपील क्र. २१/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका